औरंगाबाद महसूल विभागातील २ क्षेत्रिय अधिकाऱ्यांना जुन्या निर्लेखित वाहनांच्या बदली नवीन वाहने खरेदी करण्यास मंजुरी देणेबाबत..

महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग

शासन निर्णय क्रमांकः वाहने-२०१९/प्र.क्र.४१/ई-८

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक :२७ जून, २०१९.

संदर्भ:-

१) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र. जेपीएस-२०१४/प्र.क्र.०७/ई-८, दि. १२/०९/२०१६

२)शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक-वाहन-२०१६/प्र.क्र.५१/१६/विनियम, दि.२१/०१/२०१७.

३)जिल्हाधिकारी, बीड यांचे पत्र क्र. २०१९/जिबी डेस्क-७/संकिर्ण/ कावि- दि. १६/०३/२०१९

प्रस्तावना:-

औरंगाबाद महसूल विभागातील लेखाशिर्ष "२०५३- जिल्हा प्रशासन" या खाली वेतन आहरित करणाऱ्या १३६ क्षेत्रीय अधिकाऱ्यांना शासकीय वाहनांची अनुज्ञेयता संदर्भाधीन दि.१२/०९/२०१६ च्या शासन निर्णयान्वये मंजूर करण्यात आली आहे. जिल्हाधिकारी, बीड यांनी त्यांच्या संदर्भाधिन दि.१६/०३/२०१९ च्या पत्रान्वये जिल्हाधिकारी, बीड तसेच अपर जिल्हाधिकारी, बीड यांचेकरिता निर्लेखित केलेल्या वाहनांच्या बदली नवीन वाहन खरेदीस मंजूरी देण्यासाठीचा प्रस्ताव शासनास सादर केला आहे. सदर प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय:-

औरंगाबाद महसूली विभागातील या शासन निर्णयासोबतच्या सहपत्र -अ॰ मध्ये नमूद केलेल्या जिल्हाधिकारी, बीड व अपर जिल्हाधिकारी,बीड या २ क्षेत्रिय अधिकाऱ्यांना त्यांच्या पूर्वीच्या जुन्या निर्लेखित वाहनांच्या बदली नवीन वाहने खरेदी करण्यास व तदप्रित्यर्थ येणाऱ्या अनुक्रमे रु. ७.०० लाख व रु.६.०० लाख याप्रमाणे एकूण रु.१३.०० लाख (रुपये तेरा लाख फक्त) च्या खर्चास खालील अटींच्या अधिन राहून शासन मंजूरी देण्यात येत आहे.-

१. शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक-वाहन-२०१६/प्र.क्र.५१/१६/विनियम, दिनांक २१/०१/२०१७ च्या शासन निर्णयामधील तरतुदीनुसार, सहपत्र -अ॰ मधील जिल्हाधिकारी यांच्यासाठी रु. ७.०० लाख व अपर जिल्हाधिकारी यांच्यासाठी रु.६.०० लाखाच्या कमाल मर्यादेत (वाहनाची किंमत + वस्तू व सेवा कर + टेम्पररी रजिस्ट्रेशन चार्जेस + मूल्यवर्धित कर + सहाय्यभूत साहित्य (Accessories) इत्यादी अंतर्भूत करुन) वाहन खरेदी करण्यात यावी.
२. शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्र. भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/उद्योग-४, दि. ०१/१२/२०१६ व क्र. संकीर्ण-२०१६/प्र.क्र. २१५/उद्योग-४, दि. २४/०८/२०१७ च्या शासन निर्णयानुसार वाहन खरेदी GeM Portal वरुन विहित पध्दतीचा अवलंब करुन करण्यात यावी.

३. शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. वाहन-२०१३/प्र.क्र.४६/१३/विनियम, दि. ०३/१०/२०१७ मधील सूचनांनुसार, वाहन आढाव्या अन्वये औरंगाबाद महसूल विभागाकरीता अनुज्ञेय ठरविण्यात आलेल्या सर्व १३६ वाहनांची माहिती महावाहन संगणक प्रणालीवर नोंदविण्यात यावी. त्याबाबतचा एकत्रित अनुपालन अहवाल वाहन नोंद प्रमाणपत्राच्या प्रतीसह विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांनी शासनास सादर करावा.

४. नवीन वाहन ज्या पदधारकास मंजूर करण्यात आले आहे, त्या पदधारकाने सदर वाहनाचा वापर संबंधित कार्यालयाच्या शासकीय कामकाजासाठीच करावा.

२. यासाठी होणारा खर्च "मागणी क्र. सी-१, २०५३- जिल्हा प्रशासन (००) ०९३, जिल्हा आस्थापना (०१) सर्वसाधारण आस्थापना (०१)(०६) आयुक्त औरंगाबाद (२०५३ ०१२६) **(अनिवार्य) दत्तमत** बाब क्र.१३- कार्यालयीन खर्च या लेखाशिर्षाखाली मंजूर उपलब्ध तरतुदीतून भागविण्यास शासन मंजुरी देत आहे.

३. सदर शासन निर्णय, वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्रमांक २०१/२०१९/विनियम, दिनांक ४/०५/२०१९ व अनौपचारीक संदर्भ क्रमांक २०१९/सं.क्र.१७३/व्यय-९, दि. २६/०४/२०१९ अन्वये त्या विभागाने दिलेल्या संमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१९०६२८१७१५५८८८१९ असा आहे. सदर शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Manisha Anil Rane

Digitally signed by Manisha Anil Rane
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=3ae05f3b600583f9600d8b04b6e849927430597b482376d876288748f5e12a0a, cn=Manisha Anil Rane
Date: 2019.06.28 17:23:52 +05'30'

(मनिषा राणे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. विभागीय आयुक्त, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद
२. जिल्हाधिकारी, बीड.
३. प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/ लेखा परीक्षा) -२, महाराष्ट्र, नागपूर .
४. जिल्हा कोषागार अधिकारी,बीड
५. सह सचिव/उप सचिव, वित्त विभाग (कार्यासन व्यय-९/विनियम), मंत्रालय, मुंबई-३२.
६. निवड नस्ती, कार्यासन ई-८, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई- ३२.

सहपत्र 'अ'

(शासन निर्णय,महसूल व वन विभाग, क्रमांक - वाहने-२०१९/प्र.क्र.४१/ई-८, दि.२७ जून २०१९ सोबतचे विवरणपत्र)

औरंगाबाद महसूल क्षेत्रिय स्तरावरील अधिकाऱ्यांच्या वापरातील निर्लेखित वाहनांचे विवरणपत्र

अ.क्र.	विभाग/ जिल्हा	वाहन वापरणाऱ्या अधिकाऱ्यांचे पदनाम	निर्लेखित वाहनाचा क्रमांक
१	औरंगाबाद/ बीड	जिल्हाधिकारी, बीड	MH २३ - F५५५५
२		अपर जिल्हाधिकारी, बीड	MH २३ - F४४४४